प. २८/०८/२०१६

# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( नगरसचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

विषय मा. विशेष महासभा
दि. २८/०८/२०१६ रोजी स. ११:३० वा
प्रकरण क्र. १६३ ते १७७

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|

१०

१५/१६

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त-१ / ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

## नगरसचिव विभाग

जा.क्र मनपा/सचिव/२७० /२०१५-१६ दिनांक :-२२ /०२/२०१६.

## // शुध्दीपत्र //

प्रति,
**सन्मा. श्री./श्रीमती** ____________________

नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय/महोदया,

या शुध्दीपत्राद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. विशेष महासभा बुधवार दि. २४/०२/२०१६ रोजी दुपारी ठिक ११.३० वाजता मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे. विषयपत्रिकेमध्ये प्रकरण क्र. १७४ हे आरक्षण क्र. २२८, २२९, २३० (सर्व्हे नं. ४८/२, ५३/२ व ५४/२) मौजे पेणकरपाडा आरजी विकसित करणेबाबत असे छापण्यात आलेले आहे. **याऐवजी प्रकरण क्र. १७४ हे सर्व्हे नं. ४८/२, ५३/२ व ५४/२ मौजे पेणकरपाडा आरजी विकसित करणेबाबत असे वाचण्यात यावे हि विनंती.**

तरी कृपया सर्व सदस्यांनी ह्यांची नोंद घ्यावी ही विनंती.

(हरेश ल. पाटील)
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**मा. विशेष महासभा सुचना क्रमांक १०, दि. १७/०२/२०१६ सोबतची विषय पत्रिका**
**सभा बुधवार दि. २४/०२/२०१६**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| १६३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात चित्रिकरणासाठी मराठी मालिका व चित्रपट यांच्याकडून आकारण्यात येत असलेल्या भाड्यात व नगरभवन वापराच्या सवलत भाड्यात देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| १६४ | मा. महासभा दि. १३/०७/२०१५, ठराव क्र. ३२ राज्य शासनाने निलंबित केल्याबाबत त्यावर ३० दिवसांच्या आत अभिवेदन सादर करणेबाबत. |
| १६५ | महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीस मान्यता देणेबाबत. |
| १६६ | विकास योजनेत भूसंपादनासाठी महानगरपालिका समुचित प्राधिकरण नसलेल्या आरक्षणाचे समुचित प्राधिकरण महानगरपालिका करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार फेरबदल करणेबाबत. |
| १६७ | मिरा भाईंदर अग्निशमन दलाकरीता ६२ मी. उंचीचे टी.टी.एल. वाहन खरेदी कामी करण्यात आलेल्या मा. महासभेत ठराव क्र. १० प्रकरण क्र. ३० दि. ०१/०७/२०१५ रोजीच्या ठरावात सुधारणा करणेबाबत. |
| १६८ | पशुवैद्यकिय दवाखाना (Veterinary Hospital) बांधणेबाबत. |
| १६९ | प्रभागात काम करणारे ठोक मानधनावरील स्थायी, अस्थायी व इतर कर्मचाऱ्यांची बायोमॅट्रीक पध्दतीने हजेरी नोंद करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| १७० | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणेबाबत.<br>संदर्भ :- महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक/२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक :- १९/११/२०१५. |
| १७१ | पुर्नविनियोजन पत्रकास मंजुरी देणे. |
| १७२ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता भाड्याने देणेबाबत धोरण निश्चित करणेबाबत. |
| १७३ | पंडित भिमसेन जोशी व इंदिर गांधी रुग्णालयासाठी मानद तत्वावर वैद्यकिय तज्ञ नेमणूक करणेबाबत. |
| १७४ | आरक्षण क्र. २२८, २२९, २३० (सर्व्हे नं. ४८/२, ५३/२ व ५४/२) मौजे पेणकरपाडा आरजी विकसित करणेबाबत. |
| १७५ | मुर्धा, राई व मोर्वा येथील खाड्यांमधील पाण्याचा प्रवाह सुरळीत करणेकरीता खाडीतील प्रवाहामधील तिवरांची व इतर झाडे काढणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| १७६ | दि. २४ फेब्रुवारी २०१५ च्या महाराष्ट्र शासनाच्या अधिसुचनेनुसार कंत्राटी सफाई कामगारांना पुनःनिर्धारीत केलेले किमान वेतन लागु करणे व फरकाची रक्कम देणेबाबत. |
| १७७ | ठाणे येथे होणाऱ्या ९६ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेल्लनासाठी महानगरपालिकेतर्फे निधी देणेबाबत. |
| १७८ | भारत स्वच्छता अभियान अंतर्गत महापौर निधीतून स्वच्छ सोसायटी तसेच संकुल यांना पारितोषिक देणेबाबत. |

**महानगरपालिका सचिव कार्यालय,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**दिनांक :- १७ फेब्रुवारी २०१६**

**(हरेश ल. पाटील)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

१.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १७/०२/२०१६.

## मा. विशेष महासभा

**मा. विशेष महासभा सूचना क्र. :- १०, दिनांक १७/०२/२०१६**

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती. ____________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा बुधवार दि. २४/०२/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. १०, दि. १७/०२/२०१६ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.

E/Backup- 2/D/MD/Nagarsachiv/Vishaypatrika/Vishaypatrika-Mahasabha 12-17

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**मा. विशेष महासभा सुचना क्रमांक १०, दि. १७/०२/२०१६ सोबतची विषय पत्रिका**
**सभा बुधवार दि. २४/०२/२०१६**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| १६३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात चित्रिकरणासाठी मराठी मालिका व चित्रपट यांच्याकडून आकारण्यात येत असलेल्या भाड्यात व नगरभवन वापराच्या सवलत भाड्यात देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| १६४ | मा. महासभा दि. १३/०७/२०१५, ठराव क्र. ३२ राज्य शासनाने निलंबित केल्याबाबत त्यावर ३० दिवसांच्या आत अभिवेदन सादर करणेबाबत. |
| १६५ | महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीस मान्यता देणेबाबत. |
| १६६ | विकास योजनेत भूसंपादनासाठी महानगरपालिका समुचित प्राधिकरण नसलेल्या आरक्षणाचे समुचित प्राधिकरण महानगरपालिका करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार फेरबदल करणेबाबत. |
| १६७ | मिरा भाईंदर अग्निशमन दलाकरीता ६२ मी. उंचीचे टी.टी.एल. वाहन खरेदी कामी करण्यात आलेल्या मा. महासभेत ठराव क्र. १० प्रकरण क्र. ३० दि. ०१/०७/२०१५ रोजीच्या ठरावात सुधारणा करणेबाबत. |
| १६८ | पशुवैद्यकिय दवाखाना (Veterinary Hospital) बांधणेबाबत. |
| १६९ | प्रभागात काम करणारे ठोक मानधनावरील स्थायी, अस्थायी व इतर कर्मचाऱ्यांची बायोमॅट्रीक पध्दतीने हजेरी नोंद करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| १७० | भारत स्वच्छता अभियान अंतर्गत महापौर निधीतून स्वच्छ सोसायटी तसेच संकुल यांना पारितोषिक देणेबाबत. |
| १७१ | पुर्नविनियोजन पत्रकास मंजुरी देणे. |
| १७२ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता भाड्याने देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| १७३ | पंडित भिमसेन जोशी व इंदिरा गांधी रुग्णालयासाठी मानद तत्वावर वैद्यकिय तज्ञ नेमणूक करणेबाबत. |
| १७४ | आरक्षण क्र. २२८, २२९, २३० (सर्व्हे नं. ४८/२, ५३/२ व ५४/२) मौजे पेणकरपाडा आरजी विकसित करणेबाबत. |
| १७५ | मुर्धा, राई व मोर्वा येथील खाड्यांमधील पाण्याचा प्रवाह सुरळीत करणेकरीता खाडीतील प्रवाहामधील तिवरांची व इतर झाडे काढणेबाबत शासनास प्रस्ताव पाठविणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| १७६ | दि. २४ फेब्रुवारी २०१५ च्या महाराष्ट्र शासनाच्या अधिसुचनेनुसार कंत्राटी सफाई कामगारांना पुनःनिर्धारीत केलेले किमान वेतन लागु करणे व फरकाची रक्कम देणेबाबत. |
| १७७ | ठाणे येथे होणाऱ्या ९६ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेल्लनासाठी महानगरपालिकेतर्फे निधी देणेबाबत. |

(सुरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**दिनांक :- १७ फेब्रुवारी २०१६**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. विशेष महासभा दि. २४/०२/२०१६**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक ( १६३ )** :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात चित्रिकरणासाठी मराठी मालिका व चित्रपट यांच्याकडून आकारण्यात येत असलेल्या भाडयात व नगरभवन वापराच्या सवलत भाडयात देणेबाबत विचार विनियन करुन निर्णय घेणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे मुंबई महानगरपालिकेलगत असल्याने या शहरात विविध भाषिक मालिक व चित्रपट यांचे चित्रिकरण होत असते. सार्वजनिक जागांवर होणाऱ्या चित्रिकरणासाठी महानगरपालिकेने रु.१५०००/- प्रतिदिन हे दर निश्चित केले आहेत. मराठी मालिका व चित्रपट यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना रु.१५,०००/- प्रतिदिन या दरात सवलत देणे व इंग्रजी, हिंदी भाषिक चित्रिकरण मोठया प्रमाणावर असल्याने त्याच्यांकडून जादा दर आकारावेत याबाबत मागणी करण्यात आली आहे.

तसेच भाईंदर (प.) नगरभवन हॉलचे सध्या आकारण्यात येत असलेले रु.५०००/- प्रति दिन हे भाडे आर्थिक दुर्बल घटकातील नागरीकांसाठी जास्त असल्याने अशा घटकांबाबत धोरण निश्चित करुन त्यांना २५% सवलत देऊन हॉल भाडयाने देण्याबाबत देखिल प्रस्ताव आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता भाडयाने देताना आकारण्यात येणारे भाडे हे अल्प असून त्यामधून मिळणाऱ्या उत्पन्नातून मालमत्तेची देखभाल, दुरुस्तीचा खर्च निघत नाही. तरी प्रस्तावावर विचार विनिमय होऊन महानगरपालिकेच्या हिताचा निर्णय होण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-5/DK/2015-16 /MG 7

आपवारा प्राप्त दि. १५/१ /२०१६ वेळ ११:५५
मा. स्थायी समिती / [illegible]
नोंद रजिस्टर अ. क्र. १६

दिनांक १५/१/१५
नगरसचिव विभाग.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महासभेने, दि.१३ जुलै, २०१५ रोजी पारित केलेला ठराव क्र. ३२ निलंबित करण्याबाबत.

प्रकरण क्र. ९६४ करिता

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक. मिभाम ११९५/२०४१/प्र.क्र.६९/१५/नवि-२८
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २० जानेवारी, २०१६.

संदर्भः- १) नगर विकास विभाग, शासन पत्र क्रमांकः- मिभाम-/अनौ.स.२०/प्र.क्र.२७४/११/नवि-२८, दिनांक २४ जून, २०१४

२) मिरा-भाईंदर महानगरपालिका महासभेचा ठराव क्र. ३२, दिनांक १३ जुलै, २०१५.

३) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे जा.क्र.मिभा/मनपा/नर/२१७०/२०१५-१६, दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ चे पत्र.

प्रस्तावनाः-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे महाजनवाडी सर्व्हे क्र.१०७/१पै, १०८/१, २, ३/१०९/२३, २४, २७, २८, ११०/५पै. या जागेमधील नागरी सुविधा क्षेत्राच्या एकूण ७७८१.०२ चौ.मी. क्षेत्रापैकी २८९०.५१ चौ.मी. क्षेत्रामध्ये शाळेचे बांधकाम करण्यास मिरा-भाईंदर महानगरपालिकेने मे.काऊटाऊन लॅन्ड डेव्हलपर्स प्रा.लि. या विकासकास दिलेली बांधकाम परवानगी व विकासकास उक्त क्षेत्र ३० वर्षे भाडेपट्ट्यावर देण्याबाबत महानगरपालिकेने केलेला करारनामा रद्द करण्याबाबत व शाळेची जागा महानगरपालिकेने ताब्यात घेऊन विकसित करण्याबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महासभेने दि.१३/०७/२०१५ रोजी ठराव क्र. ३२ पारित केलेला आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महासभेने यापूर्वी सदरील शाळागृह इमारतीचे भाडे निश्चित करण्याच्या अनुषंगाने "नागरी सुविधा क्षेत्रापैकी ५० टक्के म्हणजे एकूण ३८९०.५१ चौ.मी. एवढ्या क्षेत्रासाठी मे. काऊटाऊन लॅंड डेव्हलपर्स प्रा.लि. यांना शाळागृहाकरीता दरमहा रु.२,७५,०००/- इतके भाडे आकारण्यात यावे व त्यानंतर पुढील प्रत्येक ५ वर्षांनी १०% भाडेवाढ करण्यात यावी. ही प्रक्रिया ३० वर्षापर्यंत चालू ठेवावी व ३० वर्षानंतर नवीन भाडेवाढीचा प्रस्ताव सादर करावा. ठराव झाल्यानंतर १५ दिवसांत तसा करारनामा करावा व त्या दिवसापासून भाडे आकारणी करावी, अशा आशयाचा ठराव क्र. ८५, दि.०१/०२/२०११ पारीत केला होता. प्रस्तुत ठराव क्र.८५, दि.०१/०२/२०११ विखंडीत करण्याबाबत शासनास प्राप्त झालेल्या तक्रारीस अनुलक्षून, सदर विनिर्दिष्ट प्रकरण शासनाच्या हस्तक्षेपासाठी विहित केलेल्या निकषात बसत नसल्याने, कलम ४५१(१) अन्वये शासनास प्राप्त विशेष अधिकारांतर्गत हस्तक्षेप करणे योग्य होणार नाही, असा निर्णय घेऊन संदर्भ क्र. १ येथील शासन पत्रान्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेस कळविलेले आहे. शासनाने याबाबत तेव्हा घेतलेल्या भुमिकेशी सुसंगत असा निर्णय आता देखील घेणे आवश्यक

असल्याने, तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेने आता पारित केलेला ठराव क्र.३२, दिनांक १३/०७/२०१५ हा महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या विरोधात असल्याने हा ठराव निलंबित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :**

उपरोक्त पार्श्वभूमीवर आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी त्यांच्या संदर्भ क्र. ३ येथील पत्राद्वारे प्रस्तावित केल्यानुसार, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५१ मधील तरतुदीनुसार शासनास असलेल्या अधिकारांचा वापर करुन मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महासभेने दिनांक १३ जुलै, २०१५ रोजी पारित केलेला ठराव क्र. ३२ प्रथमतः निलंबित करण्यात येत आहे. याबाबत संबंधितांना काही अभिवेदन करावयाचे असल्यास त्यांनी ३० दिवसांच्या आत शासनास सादर करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१६०१२०१६२८०५८७२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Jayasingrao N Patil

Digitally signed by Jayasingrao N Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Jayasingrao N Patil
Date: 2016.01.20 16:29:19 +05'30'

(ज. ना. पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

२) महापौर, मिरा-भाईंदर महानगरपालिका, जिल्हा ठाणे.

३) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका, जिल्हा ठाणे.

४) सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

५) निवडनस्ती (नवि-२८)

**अ.शा.पत्र क्रमांक:-** मिभाम-१११५/२०४१/प्र.क्र.६९/१५/नवि-२८
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
*दिनांक: २० जानेवारी, २०१६*

(३)

**ज. ना. पाटील**
**उप सचिव**

**विषय:-** मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महासभेने दि.१३ जुलै, २०१५ रोजी पारित केलेला ठराव क्र.३२ निलंबित करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या समक्रमांकाच्या शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे. आपण आपल्या दि.२६/०८/२०१५ च्या पत्रान्वये प्रस्तावित केल्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महासभेने दि.१३ जुलै, २०१५ रोजी पारित केलेला ठराव क्र.३२ उक्त शासन निर्णयान्वये निलंबित करण्यात आला आहे.

०२. यासंदर्भात आपले लक्ष नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र.२२/नवि-२०, दि.१३/०१/२०१६ कडे वेधण्यात येत आहे. सदर शासन परिपत्रकाद्वारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५१ मधील तरतूदीनुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे.

०३. आपणास विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रकातील परिच्छेद ४ (ब) येथे विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार उपरोल्लेखित शासन निर्णय दि.२०/०१/२०१६ अन्वये निलंबित करण्यात आलेल्या ठरावाच्या अनुषंगाने सदर बाब संबंधित प्राधिकरणाच्या तसेच महासभेच्या निदर्शनास आणण्यात यावी. यासंदर्भात संबंधित प्राधिकरणाने अभिवेदन सादर केल्यास ते आपल्या अभिप्रायासह शासनास ३० दिवसांच्या आत सादर करण्याची व्यवस्था केल्यास, मी आपला आभारी राहीन.

शुभेच्छांसह,

आपला स्नेहांकित,

ज.ना.पाटील

( ज. ना. पाटील )

**श्री. अच्युत हांगे**
**आयुक्त,**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका,**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. विशेष महासभा दि. २४/०२/२०१६
## ।। गोषवारा ।।

(७)

रण क्र. १६५ <u>महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीस मान्यता देणेबाबत...</u>

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्रेणी-०२, प्रशासकीय सेवा संवर्गात प्रशासन अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, उपकर निर्धारक व संकलक, आस्थापना अधीक्षक, स्टोअर ऑफिसर, उप-नगरसचिव, अधीक्षक (मार्केट-परवाना), प्रभाग क्षेत्रीय अधिकारी, हेडक्लार्क ची १८ पदे मंजूर आहेत. सदर पदांची वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४४०० आहे. मंजुर १८ पदांपैकी ०८ पदे रिक्त आहेत.

आस्थापनेवरील सदर रिक्त पदांवर पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि. १६/१२/२०१५ रोजी आयोजित करण्यात आली होती.

शासनाने मंजूर केलेल्या सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ मध्ये सदर पदांवरील पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी अर्हता खालील प्रमाणे नमुद आहे.

<u>कोटा - १०० % पदोन्नती</u>

अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.

ब) महापालिकेच्या आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे मुख्य लिपीक किंवा समकक्ष संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून किमान ०५ वर्षांचा अनुभव.

श्रेणी-०२ प्रशासकीय संवर्गातील रिक्त पदांपैकी बिंदु नियमावलीनुसार अ.जा.-१,भ.ज.-१ खुला-६ प्रवर्गातील आहेत.

वरील प्रमाणे अर्हता लक्षात घेता, मुख्यलिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून पात्र ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांना ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे श्रेणी-०२ संवर्गातील प्रशासकीय सेवा संवर्गातील पदावर पदोन्नती देणेकरीता गठीत पदोन्नती निवड समितीने खालील प्रमाणे कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती करीता निवड केलेली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | कार्यरत पद | प्रवर्ग | धारण करीत असलेली अर्हता | |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. विजय सदानंद पाटील | मुख्यलिपीक | खुला | १ | बी.ए. (पेरिअर युनिव्हर्सिटी)<br>एल.जी.एस.<br>एल.एस.जी.डी. |
| | | | | २ | मुख्यलिपीक या पदावर ०५ वर्षांपेक्षा जास्त काम केल्याचा अनुभव आहे. |

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | कार्यरत पद | प्रवर्ग | धारण करीत असलेली अर्हता | |
|---|---|---|---|---|---|
| २. | श्री. अशोक गायकवाड | मुख्यलिपीक | अनुसूचित जाती | १ | बी.कॉम. (यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ)<br>एल.जी.एस.<br>जी.डी. अँण्ड सी.ए.<br>एल.एस.जी.डी. |
| | | | | २ | मुख्यलिपीक या पदावर ०५ वर्षांपेक्षा जास्त काम केल्याचा अनुभव आहे. |
| ३. | श्री. प्रकाश कुलकर्णी | मुख्यलिपीक | खुला | १ | बी.ए. (अर्थशास्त्र) (यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ)<br>एल.एस.जी.डी.<br>एल.जी.एस.<br>डी.एल.जी.एफ.एम. |
| | | | | २ | मुख्यलिपीक या पदावर ०५ वर्षांपेक्षा जास्त काम केल्याचा अनुभव आहे. |
| ४. | श्री. जगदीश भोपतराव | मुख्यलिपीक | खुला | १ | बी.कॉम (यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ)<br>एल.एस.जी.डी.<br>एल.जी.एस.<br>डी.एल.जी.एफ.एम. |
| | | | | २ | मुख्यलिपीक या पदावर ०५ वर्षांपेक्षा जास्त काम केल्याचा अनुभव आहे. |
| ५. | श्रीम. अन्नपूर्णा आवडेकर | मुख्यलिपीक | खुला | १ | बी.कॉम (मुंबई युनिर्व्हसिटी)<br>एल.एस.जी.डी.<br>एल.जी.एस.<br>डी.एल.जी.एफ.एम. |
| | | | | २ | मुख्यलिपीक या पदावर ०५ वर्षांपेक्षा जास्त काम केल्याचा अनुभव आहे. |

श्रेणी-०२ प्रशासकीय संवर्गातील पदे ही सहाय्यक आयुक्त पदाशी समतुल्य आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहीत आहे. त्यामुळे वरील प्रमाणे मुख्यलिपीक पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना श्रेणी-०२ प्रशासकीय सेवा संवर्गातील पदावर पदोन्नतीने नेमणूक करणेस मा. महासभेच्या मंजूरीसाठी सादर.

(अच्युत हांगे,)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. १३/०१/२०१८ वेळ २।४५ २-१०
~~मा. स्थायी समिती~~ / ...... गोषवारा
नोंद रजिस्टर न. १४
नगरसचिव विभाग.

नगररचना विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

विशेष मा. महासभा दि. २४/०२/२०१६

## // गोषवारा //

प्रकरण क्र. (१६९) - **विकास योजनेत भूसंपादनासाठी महानगरपालिका समुचित प्राधिकरण नसलेल्या आरक्षणाचे समुचित प्राधिकरण महानगरपालिका करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार फेरबदल करणेबाबत**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/९६/युडी-१२, दि.१४/०५/९७ अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.१५/०७/९७ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९८/९४१/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

तसेच विकास नियंत्रण नियमावलीमध्ये शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/ नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झालेले आहेत.

सदर विकास योजनेमध्ये सार्वजनिक वापराची विविध आरक्षणे ३८६ असून महानगरपालिका क्षेत्रामधील डोंगरी, तारोडी, उत्तन, पाली, चौक या महसूली गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून M.M.R.D.A. यांची नेमणूक शासनाने केलेली आहे. तसेच या गावासह स्वतंत्र विकास योजना मंजूर झालेली आहे. त्याप्रमाणे सदर क्षेत्रामधील आरक्षणे वगळता महानगरपालिका नियोजन प्राधिकरण असलेल्या उर्वरीत क्षेत्रामध्ये एकूण ३३४ आरक्षणे शिल्लक राहत आहेत.

सदर ३३४ आरक्षणामध्ये आ.क्र. १८५ (बस स्टँन्ड) हे मिरारोड स्टेशन जवळ दर्शविलेले असून या आरक्षणाचे समुचित प्राधिकरण M.S.R.T.C. आहे. तसेच आ.क्र. ३१६ (बस स्टँन्ड) हे आरक्षण छत्रपती शिवाजी मार्गावर झंकार कंपनी येथे दर्शविलेले असून या आरक्षणाचे समुचित प्राधिकरण B.E.S.T. आहे.

महानगरपालिकेच्या परिवहन सेवेसाठी अद्यावत (बस स्टँन्ड) सह बस डेपो असणे आवश्यक असून यासाठीची जागा सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या ताब्यात नाही. तसेच मिरा भाईंदर शहराची विकास योजना मंजूर होवून जवळपास १८ वर्षे पुर्ण झालेली असून संबंधित समुचित प्राधिकरणांनी वरिलप्रमाणेच्या आरक्षणाच्या जागा हस्तांतरित करुन घेतलेल्या नसून त्यासाठी महानगरपालिकेकडे प्रस्ताव सादर केलेला नाही.

यास्तव सदरच्या आ.क्र. १८५ व ३१६ च्या संबंधीत समुचित प्राधिकरणा ऐवजी समुचित प्राधिकरण म्हणून मिरा भाईंदर महानगरपालिका करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करणेस निर्णय होणेसाठी मा. महासभेसमोर सादर.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

कोषद्वारा प्राप्त दि. २/०२/२०१६ वेळ ४:३०

मा. स्थायी समिती/महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ....................

लिपीक

नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २४/ ०२ /२०१६

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. ( १८७ ):-** मिरा भाईदर अग्निशमन दलाकरीता ६२ मी. उंचीचे टी.टी.एल. वाहन खरेदी कामी करण्यात आलेल्या मा. महासभेत ठराव क्र. १० प्रकरण क्र. ३० दि. ०१/७/२०१५ रोजीच्या ठरावात सुधारणा करणेबाबत.

अग्निशमन विभागाकरिता ६२ मी. उंच टी. टी. एल. वाहन खरेदी करणेकरिता मा. महासभा ठराव क्र. १० प्रकरण क्र. ३० दि. ०१/०७/२०१५ अन्वये ठराव पारीत केलेला आहे. त्या अनुषंगाने सदर वाहनाचे तांत्रिक तपशील तपासुन अभिप्राय मिळणेकरिता मा. संचालक सो, अग्निशमन सेवा यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार मा. संचालक सो, यांनी अभिप्राय दिलेला आहे.

मा. संचालक सो यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार ६२ मी. उंचीचे वाहन किंवा त्यापेक्षा अधिक उंचीचे वाहन खरेदी करणेबाबत शिफारस करण्यात आली आहे. सद्यस्थितीत अग्निशमन विभागाकडुन ७० मी. उंची पर्यंतच्या इमारतींकरिता तात्पुरता नाहरकत दाखला देण्यात आलेला आहे. त्यामुळे मा. संचालक सो यांनी सुचविल्यानुसार व बाजारात उपलब्ध अधिक उंचीचे वाहन खरेदी केल्यास इमारतींच्या उंचीच्या व अग्निशमनाच्या दृष्टीने सोयीचे ठरेल.

वरिल बाब लक्षात घेता अग्निशमन विभागाकरीता ६२ मी. उंचीचे वाहन किंवा त्यापेक्षा अधिक उंचीचे वाहन खरेदी करणे उपयुक्त ठरेल असे अद्ययावत टी. टी. एल. वाहन खरेदी करणेकामी मा. महासभा ठराव क्र. १० प्रकरण क्र. ३० दि. ०१/०७/२०१५ रोजीच्या ठरावात सुधार करुन तसेच सदर कामी जाहिर निविदा प्रसिध्द करणेस व येणाऱ्या खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस असे.

आयुक्त

मिरा भाईदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि.१५/ २/२० ग़वेळ ८.३०
मा. स्थायी ~~समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर क्र. क्र...१९...................

लिपीक
नगरसचिव विभाग.

89 Maha 16

नगररचना विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. २४/ ०२ /२०१६

## // गोषवारा //

**प्रकरण क्र(१६८) पशुवैद्यकिय दवाखाना (Veterinary Hospital) बांधणेबाबत.**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/९६/युडी-१२, दि.१४/०५/९७ अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.१५/०७/९७ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९८/९४१/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

सदरच्या मंजूर योजनेमध्ये आ.क्र. ८१ हे पशुवैद्यकिय दवाखाना (Veterinary Hospital) साठी मौजे भाईंदर, स.क्र.-(जुना) ७५५पैकी, (नविन) ३३७पैकी या जागेमध्ये आरक्षित दर्शविलेले असून मंजूर विकास योजनेप्रमाणे सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र ५६०० चौ.मी. आहे. सदरचे क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात मिळालेले नसून सदर आरक्षणाखालील जागा प्राप्त सी.आर.झेड. च्या वर्गीकरणाच्या नकाशाप्रमाणे सी.आर.झेड. ने बाधीत होत आहे.

मिरा भाईंदर शहरामध्ये पशुवैद्यकिय दवाखाना (Veterinary Hospital) उपलब्ध नसून जनतेच्या सुविधेसाठी सदर पशुवैद्यकिय दवाखान्याची आवश्यकता आहे तथापि मंजूर विकास योजनेमध्ये दुसरे आरक्षण दर्शविलेले नाही.

सद्यस्थितीत महानगरपालिकेकडे सार्वजनिक वापराचे बांधकाम प्रस्तावित होवू शकणारे नागरी सुविधा क्षेत्राचे खालीलप्रमाणेचे भूखंड प्राप्त आहेत.

| अ.क्र. | मौजे | स.क्र. / हि.क्र. | नागरी सुविधा भूखंडाचे क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १ | मिरा | सि.स.क्र. १४४२ ते १४४६, १४९१ ते १५११ व इतर | ७३०.१२ चौ.मी. |
| २ | मिरा | सि.स.क्र. १७२३ ते १७२६, १७९३ व इतर | ४३४.५२ चौ.मी. |
| ३ | मिरा | सि.स.क्र. १४७५, १५५६ ते १५६१, १५६५ ते १५६७ व इतर | ५५८.७० चौ.मी. |
| ४ | मिरा | सि.स.क्र. ५पै., १८, ३२ | १०५.६४ चौ.मी. |
| ५ | गोडदेव | ११२/६, ६७/६ | १३३.०० चौ.मी. |
| ६ | भाईंदर | ७०७/३ब, ७०८/५, ३०४/३पै., ३०१/५ | १६९.४८ चौ.मी. |
| ७ | खारी | १४९/पै., ११/३ | ४७.५० चौ.मी. |
| ८ | घोडबंदर | ११०/१पै., २२४/१अे.पै., २२४/१बी.पै. | २३०.०० चौ.मी. |
| ९ | घोडबंदर | २१/१, २४/१पै. | ८६०.९५ चौ.मी. |
| १० | मिरा | सि.स.क्र. १२१४, १२१५, १२५९ ते १२६२, १२९१ ते १२९४, १३०९ ते १३११, १३३५ ते १३३८, १३८९ ते १३९०, १४२४ ते १४३५, १४८९, १४९० व १६४५ | ६६९.०० चौ.मी. |

सदरच्या नागरी सुविधा क्षेत्राच्या भूखंडापैकी सदरच्या काशिमिरा पोलीस चौकी जवळच्या मौजे मिरा, सि.स.क्र. १२१४, १२१५, १२५९ ते १२६२, १२९१ ते १२९४, १३०९ ते १३११, १३३५ ते १३३८, १३८९, १३९०, १४२४ ते १४३५, १४८९, १४९० व १६४५ या जागेच्या मंजूर रेखांकनामधील ६६९ चौ.मी. क्षेत्रामध्ये पशुवैद्यकिय दवाखाना (Veterinary Hospital) साठीचे बांधकाम संबंधित विकासाकडून विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात करुन घेतल्यास त्यासाठी महानगरपालिकेचे रक्कम खर्च न होता महानगरपालिकेला पशुवैद्यकिय दवाखाना (Veterinary Hospital) ची इमारत प्राप्त होवु शकेल.

सबब याबाबत निर्णय होणेसाठी मा. महासभेसमोर सादर.

(अच्युत हांगे) २/२/१६
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

नोपत्रास प्राप्त दि. १२/०२/२०१६ वेळ ८:३०
मा. ~~स्थायी~~ ... टोनदारा
नोंद रजिस्टर ...
लिपीक
नगरसचिव विभाग.

## मिरा-भाईंदर महानगरपालिका
### मा. महासभा दि. २८/०२/२०१६
### मिळकत विभाग
### // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (१७२)** मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता भाड्याने देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने खालील मालमत्ता मा. महासभेच्या निर्णयानुसार भाड्याने दिल्या आहेत.

| अ.क्र | मालमत्तेचे वर्णन | प्रति महिना / प्रति वर्ष भाडे | भाड्याने दिल्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | राई गाव व्यायामशाळा, राई, उत्तन रोड, भाईंदर (प.) | ६०००/- वार्षिक | दि. ०१/१०/२०१३ ते दि.३०/०९/२०१८ (५ वर्षे) |
| २ | घोडबंदर जुनी शाळा इमारत, २ वर्ग, घोडबंदर, मिरा रोड (पु.), | १८००/- वार्षिक | दि. १७/०९/२०१३ ते दि.१६/०९/२०१८ (५ वर्षे) |
| ३ | घोडबंदर समाज मंदिर, घोडबंदर, मिरा रोड (पु.), | १८००/- वार्षिक | दि. २०/१०/२०१३ ते दि.१९/१०/२०१८ (५ वर्षे) |
| ४ | स्व. क्विंटन कोरीया व्यायामशाळा डोंगरी, डोंगरी गाव, उत्तन रोड, भाईंदर (प.) | ६०००/- वार्षिक | दि. ०१/१०/२०१३ ते दि.३०/०९/२०१८ (५ वर्षे) |
| ५ | योग ध्यान शेड जेसल पार्क चौपाटी, भाईंदर (पू.). | १८००/- वार्षिक | दि. १८/१०/२०१३ ते दि.१७/१०/२०१८ (५ वर्षे) |
| ६ | गोकुळ व्हिलेज, व्यायामशाळा, शांती पार्क, मिरा रोड पू. | ६०००/- वार्षिक | दि. ०१/०३/२०१४ ते दि.२८/०२/२०१९ (५ वर्षे) |
| ७ | डॉ. बाबासाहेब आबेंडकर नगर, समाजमंदिर (व्यायामशाळा), उत्तन रोड, भाईंदर (प.) | १८००/- वार्षिक | दि. १३/०१/२०१३ ते दि.१२/०१/२०१८ (५ वर्षे) |
| ८ | साईबाबा नगर समाजमंदिर, मिरा रोड पू. | १८००/- वार्षिक | दि. ०१/०३/२०१४ ते दि.२८/०२/२०१९ (५ वर्षे) |
| ९ | शिव मंदिराजवळील समाज मंदिर, पेणकर पाडा, मिरा रोड (पू.) | १८००/- वार्षिक | करारनामा झालेला नाही. |
| १० | आदर्श इंदिरानगर येथील शाळा, नवघर, भाईंदर पू. | १८००/- वार्षिक | दि. ०१/१०/२०१३ ते दि.३०/०९/२०१८ (५ वर्षे) |
| ११ | बेकरी गल्ली, समाजमंदिर, भाईंदर (प.) | १८००/- वार्षिक | दि. २९/१२/२०१३ ते दि.२८/१२/२०१८ (५ वर्षे) |
| १२ | मिरागाव, हनुमान मंदिर रंगमंच, मिरा रोड पू. | २१९२/- वार्षिक | करारनामा झालेला नाही. |
| १३ | धारावी देवी समाजमंदिर, तारोडी, भाईंदर (प.) | १८००/- वार्षिक | दि.१६/०३/२०१३ ते दि. १५/०३/२०१८ (५ वर्षे) |

वरील मालमत्तेचा संबंधित संस्थेमार्फत सामाजिक व सार्वजनिक कामासाठी वापर करण्यात येत असल्याने व वाणीज्य वापर नसल्याने व चालू बाजार भावापेक्षा कमी भाडे आकारण्याबाबत मा. महासभेचा निर्णय झाल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ (ग) नुसार शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

तसेच खालील मालमत्ता शासकीय दराने भाड्याने देण्यात आलेल्या आहेत.

| अनु. क्र | मालमत्तेचे वर्णन | सद्यस्थिती |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पू.), उड्डाणपुलाखालील शिधावाटप कार्यालय | आजपर्यंत भाडे जमा केलेले नाही. |
| २ | भाईंदर (प.), रेल्वेस्थानकाजवळील इमारती मधील राज्य परिवहन महामंडळ (एस.टी. डेपो जागा) | आजपर्यंत भाडे जमा केलेले नाही. |

| | | |
|---|---|---|
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, (नगरभवन) पहिला मजला, तलाठी कार्यालय | आजपर्यंत भाडे जमा केलेले नाही. |
| ४ | मिरा रोड (पू.), रामनगर येथील राष्ट्रसंत आचार्य पदमसागर सुरीश्वरजी भवनमधील सह.दुय्यम निबंधक कार्यालय | दि. ०१/०१/२०१३ ते दि. ३१/१२/२०१७ पर्यंत भाडेतत्त्वावर देण्यात आलेला आहे. |
| ५ | मिरा रोड (पू.), रामनगर येथील राष्ट्रसंत आचार्य पदमसागर सुरीश्वरजी भवनमधील उप-निबंधक सहकारी संस्था, ठाणे कार्यालय | भाड्याने देण्याची कार्यवाही सुरु आहे. |

त्याचप्रमाणे भाईंदर (प.), मिरा-भाईंदर शॉपिंग सेंटरमधील खालील गाळे भाड्याने देण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | गाळा क्र. | भाडेकरुचे नाव | वार्षिक भाडे | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | १ | श्री. गोपाळ कावणकर | रु.१३,९४४/- | शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. करारनामा झालेला नाही. |
| २ | २ | श्री. हेमंत जगन्नाथ घरत | रु.१३,९४४/- | |
| ३ | ३ | श्री. मोहन शंकर चव्हाण | रु.१३,९४४/- | |
| ४ | ४ | श्री. नंदलाल चिमण माळी | रु.१३,९४४/- | |
| ५ | ५ | श्री. विष्णू शिरवळकर | रु.१३,९४४/- | |
| ६ | ६ | श्री. शिवराम गुंडप्पा वेजंत्री | रु.१३,९४४/- | |
| ७ | ७ | श्री. परमजीत सिंग हुंजन | रु.१३,९४४/- | |
| ८ | ८ | श्री. सुरेश कावणकर | रु.१३,९४४/- | |
| ९ | ९ | श्री. आलम खान | रु.१४,७००/- | |
| १० | १० | श्रीम. अजिमा ईस्माईल कुरेशी | रु.१४,२८०/- | |
| ११ | ११ | श्री. रमेश हरगोविंद जोशी | रु.१६,८३९/- | |
| १२ | १२ | श्री. मिश्रीलाल वैष्णव | रु.१४,१७२/- | |
| १३ | १३ | श्री. उमाशंकर बाबुराव गुप्ता | रु.१४,१७२/- | |
| १४ | १६ | श्री.निलेश अनंतराव मोहिते | रु.२७,१२०/- | |
| १५ | १४ | हिंदु वैकुंठ धाम, सामग्री भंडार | रु.१/- | दि.१८/०४/२०१२ ते दि.१७/०४/२०१७ पर्यंत भाडे तत्त्वावर देण्यात आलेला आहे. |

तदनंतर मा. महासभा दि. १३/०५/२०१५ ठराव क्र. ०१ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१. महानगरपालिकेने चालुबाजार भावाप्रमाणे (Ready Recknor) दर निश्चित करण्यासाठी नियुक्त केलेल्या द्विस्तरीय समितीत बांधकाम व नगररचना विभागाचे अधिकारी यांनी निश्चित करुन दिलेल्या चालु बाजार भावाप्रमाणे (Ready Recknor) प्रमाणे मुल्य ठरवावे
२. सदर मालमत्तेचे बाजार भावाप्रमाणे मूल्य ठरल्यानंतर जाहिर निविदा प्रसिद्ध करावी.
३. निविदा द्वारे प्राप्त देकार मंजुरीसाठी मा. स्थायी समितीची मंजुरी घ्यावी.

त्यानुसार सर्व मालमत्ता भाड्याने देणेसाठी प्रक्रिया करण्यात येत आहे, तथापि चालू बाजारभावाप्रमाणे मालमत्ता भाड्याने घेण्यास संस्था पुढे येत नाहीत. वरील परिस्थिती पाहता सदर मालमत्ता चालू बाजारभावापेक्षा कमी दराच्या भाड्याने देणेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवून मान्यता घ्यावी लागेल. सदर प्रस्तावाबाबत विचार विनिमय होऊन निर्णय होणेस शिफारस आहे.

गोषवारा प्राप्त दि१८/०२/२०१६ वेळ .........
~~मा. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र.......२२.........
नगरसचिव विभाग.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका
18/2/16

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विषेश महासभा दि २४/०२/२०१६

## सार्व. आरोग्य विभाग

### // गोषवारा //

**प्रकरण क्र.१७६:-** **दि. २४ फेब्रुवारी, २०१५ च्या महाराष्ट्र शासनाच्या अधिसुचनेनुसार कंत्राटी सफाई कामगारांना पुन:निर्धारीत केलेले किमान वेतन लागु करणे व फरकाची रक्कम देणेबाबात.**

महाराष्ट्र शासन उद्योग व ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. २४ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या अधिसूचित किमान वेतन अधिनियम 1948 अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्था या अधिसूचित रोजगाराचे किमान वेतन पुन:निर्धारित केलेल्या किमान वेतन व महागाई भत्ता देण्याबाबत राज्य शासनाने दि. २४ फेब्रुवारी, २०१५ रोजी अधिसूचना जारी केली आहे.

नगरविकास विभागाने दि. २२ जानेवारी, २०१६ रोजीच्या परिपत्रकानुसार महाराष्ट्र शासनाने स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत वगळून) या अनुसूचित रोजगारातील कामगारांना किमान वेतन दर शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. किवेअ २०१४/५१०/प्र.क्र.१५०/ कामगार-७, दि. २४/०२/२०१५ अन्वये पुन:निर्धारीत केले आहेत. सदर अधिसूचनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत कळविले आहे.

महाराष्ट्र शासनाने पुन:निर्धारीत केलेल्या किमान वेतन व महागाई भत्त्यात वाढ केल्याप्रमाणे किमान वेतन मिळण्यासाठी दि. २०/१०/२०१५, दि. १९/०१/२०१६, दि. ३०/०१/२०१६, व दि. ०५/०२/२०१६ रोजी श्रमजीवी वाराई, माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार रयत संघटना व मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंन्ट सेल प्रा. लि. यांनी सुध्दा वरील संदर्भिय पत्रानुसार किमान वेतन व इतर भत्ते मिळणेबाबत मागणी केली आहे. महानगरपालिका Principal Employer म्हणून किमान वेतन देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे.

दि. ०३/०२/२०१५ रोजी झालेल्या चर्चेनुसार तसेच दि. १०/०२/२०१६ रोजी मा. महापौर व दि. ११/०२/२०१६ रोजी उप-आयुक्त (आरोग्य) व उप-आयुक्त (मु.) यांच्या सोबत श्रमजीवी वाराई, माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार रयत संघटना यांच्या सोबत झालेल्या चर्चेनुसार किमान वेतन फरक माहे जानेवारी, २०१६ व माहे फेब्रुवारी, २०१६ मधील फरकाच्या रक्कमेस मा. महासभेची मंजुरी घेवून दि. २५/०२/२०१६ पुर्वी देण्यात यावी असे ठरले. तसे लेखी पत्र श्रमजीवी वाराई, माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार रयत संघटनेस दिल्यामुळे दि. १०/०२/२०१६ पासुन सुरु केलेला बेमुदत संप दि. ११/०२/२०१६ रोजी माघार घेवून दैनंदिन साफसफाईच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे.

यापुर्वी कामगार कायद्यानुसार मुळ वेतन व महागाई भत्ता सन २०१० मध्ये निश्चित करण्यात आला होता. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ) सन २०१० नुसार

| | | | |
|---|---|---|---|
| किमान वेतन | - | ४६००/- | प्रती कामगार |
| महागाई भत्ता | - | ३०४०/- | प्रती कामगार |
| इतर सर्व देय भत्ते | - | ४११५/- | प्रती कामगार |

ब) सन २०१५ नुसार

| | | | |
|---|---|---|---|
| किमान वेतन | - | ११५००/- | प्रती कामगार |
| महागाई भत्ता | - | २६६०/- | प्रती कामगार |
| इतर सर्व भत्ते | - | ५४४५/- | प्रती कामगार |
| विविध साहित्यवस्तु, गणवेश इत्यादी | - | १४१६/- | प्रती कामगार |

वरील बाबी विचारात घेता कंत्राटी सफाई कामगारांच्या किमान वेतन भत्ते यात लक्षणीय वाढ झालेली आहे. त्यानुसार महानगरपालिका सार्व. आरोग्य विभागात कार्यरत असलेल्या १५९९ कंत्राटी सफाई कामगारांना माहे जानेवारी, २०१६ मधील मासिक देयकातील रु. १,७६,९१,१७६/-फरकाची रक्कम देणे अनिवार्य आहे.

वरील फरकाची रक्कम देण्यासाठी सन २०१५-१६ च्या सुधारीत अंदाजपत्रकातील वॉर्ड साफसफाई/नाले सफाई या लेखाशिर्षात माहे जानेवारी, २०१६ मधील फरकाची रक्कम तरतुद करणेस व माहे फेब्रुवारी, २०१६ पासुन शासनाच्या अधिसूचनेनुसार पुन:निर्धारित किमान वेतन व इतर भत्ते देणेबाबतच्या प्रस्तावास मा. महासभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

(अच्युत हांगे)
आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका
१२/२/१६

D:\Raj Documents\STANDING GOSHVARA\kiman vetan Goshwara.docx

बोधपत्रा प्राप्त दि. १५/१२/२०१६ वेळ ४.३०

मा. स्थायी ~~समिती~~ / महासभा बोधपत्रा

नोंद रजिस्टर अ. क्र. ....२०..................

१५/१२/१६

नगरसचिव विभाग.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. विशेष महासभा दि. २४/०२/२०१६

सामान्य प्रशासन विभाग

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्रमांक (१७७) :- ठाणे येथे होणाऱ्या "९६ वे अखिल भारतीय मराठी नाटय संमेल्लनासाठी महानगरपालिकेतर्फे निधी देणेबाबत.**

फेब्रुवारी २०१६ मध्ये "९६ वे अखिल भारतीय मराठी नाटय संमेल्लन" ठाणे येथे संपन्न होणार आहे. सदर नाटय संम्मेलन हे ठाण्याचे वैभव ठरविणारे असल्याने संपूर्ण भारतभरातून मोठया प्रमाणावर नाटककार उपस्थित राहून त्यांचे कला अविष्कार दाखविणार आहेत. या संम्मेलनातून मराठी नाटय प्रकार जनतेसमोर ठेवण्याच्या दृष्टीने नाटय संमेल्लन हे उत्तम व्यासपीठ आहे. सदर नाटय संम्मेलन दोन दिवस चालणार असून या दोन दिवसात मुख्य संमेल्लन, संमेल्लन पूर्व कार्यक्रम, नाटयदिंडी, नाटय विषयक प्रदर्शने, जिल्हयातल्या, राज्यातल्या कलाकारांचे कार्यक्रम तसेच बालरंगभूमी, हौशी रंगभूमी, प्रायोजिक रंगभूमीसह सर्व घटकांना सामावून होणारे हे संमेल्लन आयोजन करण्यासाठी मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध करावा लागणार असल्यामुळे सदर नाटय संमेल्लनासाठी महानगरपालिकेकडून निधी उपलब्ध करून देणे करिता मा. पालकमंत्री, मा. श्री. एकनाथ शिंदे व मा. आमदार, श्री. प्रताप सरनाईक यांनी संदर्भिय पत्रान्वये मागणी केलेली आहे.

अर्थसंकल्पिय लेखाशिर्ष नगरभवन व सभागृह मधील ३ बर आर्ट गॅलरी व प्रदर्शने भरविणे अंतर्गत रू. ५ लाखाची तरतुद उपलब्ध आहे. भारतीय मराठी नाटय संमेल्लनासाठी अनुदान देणे ही बाब धोरणात्मक असल्याने त्यासाठी मा. महासभेची मंजूरी आवश्यक आहे.

(अच्युत हांगे)
१६/०२/१६
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

F:\Harshala\sadar\SADAR - Akhil Bhartiya Natya Sammelan - Nidhi.docx

गोषवारा प्राप्त दि. १५/२/२०१८ वेळ ९:२०

मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. २१

लिपिक १५/२/१८

नगरसचिव विभाग.